# समस्या सोडवण्याचा सराव

-- चं.प्र.देशपांडे.

समोर एका बाकावर एक सुमारे ७५ वर्षांचे आजोबा बसलेले. उजव्या हाताकडून उदय, सुमारे २४, येतो.

उदय : नमस्कार आजोबा - ( लक्ष नाही.) आजोबा, नमस्कार म्हटलं !

आजोबा : अं ?

उदय : नमस्कार म्हटलं आजोबा !

आजोबा : हं, बस, बस.( उदय बसतो.)

उदय : काय चाललंय ? बरीय तब्बेत वगैरे ?

आजोबा : हं ऽऽ बरंऽ य --

उदय : म्हणजे काही फारसं बरं दिसत नाही --

आजोबा : कशावरून ?

उदय : तुमच्या ' हं ऽऽ बरं ऽय ' वरून --

आजोबा : पण बरंय -- काही वाईट नाही --

उदय : आजोबा, वय किती तुमचं ?

आजोबा : पंच्याहत्तर ! पंच्याहत्तर पूर्ण, श्याहत्तर चालू !

उदय : भरपूर आहे मग ! आजोबा, कवळी असेल नं तुमची ?

आजोबा : हो आहे -- का ?

उदय : घाला नं मग --

आजोबा : का ? मला असं मोकळं बरं वाटतं --

उदय : का असं नाही पण तुमचं बोलणं ऐकायला मला जरा सोपं जाईल इतकंच.

आजोबा : ठीक आहे -- म्हणजे तुझ्यासाठी --घालतो --( ते पिशवीतल्या एका डब्यातून कवळी काढून घालतात --) हं --

उदय : आजोबा, तुम्ही एवढी वर्षं या जगात काढली, अनुभव घेतले -- समाधानी आहात तुम्ही ? यशस्वी झालात असं वाटतं तुम्हाला ? काय वाटतं तुम्हाला मागे वळून पाहिल्यावर ?

आजोबा : टीव्हीवर विचारतात तसले फालतू प्रश्न मला विचारू नकोस -- आणि मागे वळून पाह्यचं म्हटलं तर मानेला जरा त्रास होतो माझ्या --

उदय : छान !

आजोबा : छान काय ?

उदय : कवळी घालून तुम्ही चांगलं बोलता ! त्याला छान म्हणालो मी --

आजोबा : पण उत्तर कसं वाटलं तुझ्या प्रश्नाचं ?

उदय : असं उत्तर देणारा मनुष्य असं विचारत नसतो --

आजोबा : म्हणजे तू मला नियम शिकवतोयस् ?

उदय : नियम कसले ? माझ्या २४ वर्षांत कळलंय ते फक्त बोललो मी --

आजोबा : शहाणा आहेस !

उदय : कसं काय ?

आजोबा : नियमाला अनुभव म्हणालास -- लोक अनुभवाला नियम म्हणतात --

उदय : आजोबा, समजा मला तुमच्याकडून जगण्याची हातोटी शिकायचीय तर मी काय केलं पाहिजे ?

आजोबा : माझा गर्भसंभव झाल्यापासून ते या क्षणापर्यंतचं माझं आयुष्य तू जगलं पाहिजेस --

उदय : पण असं तुम्ही तुम्हाला आलेल्या प्रगल्भतेचं सार जर मला सांगितलं तर काही उपयोग नाही होणार ?

आजोबा : मग दाखव तू तुझ्या २४ वर्षांचं सार काढून -- आणि पाजून एखाद्या दहा वर्षांच्या पोराला !

उदय : फारच छान ! आजोबा, तुम्ही ग्रेट आहात ! तुमची थोरवी कळायचीय अजून लोकांना --

आजोबा : काही गरज नाही -- आपापल्या हजार समस्यांमध्ये लडबडलेली माणसं ही-- यांना माझी थोरवी कळून करायचंय काय --

उदय : मग कुणाला कळलं पाहिजे ?

आजोबा : तुझ्या बापाला --

उदय : माझा बापही समस्याप्रधानच आहे -- तुम्हाला सांगू का आजोबा, समस्या या प्रकाराचं मला इतकं आकर्षण आहे -- इतकं आकर्षण आहे --

आजोबा : हं ?

उदय : इतकं आकर्षण आहे की समस्या प्रधान या नावाची जर का कुणी मुलगी असेल नं तर लग्नच करून टाकीन मी तिच्याशी --

आजोबा : असल्या बाष्फळ कोट्या पुष्कळ ऐकल्यात मी ! कोट्या करणं हे फुटकळ हुशारीचं लक्षण आहे -- अक्कल कवडीची नसते त्या माणसाला -- बायाबापड्यांना आणि यडपट पुरुषांना जरा वेळ हसवतो तो -- इतकंच --

उदय : म्हणजे हसवण्याचं काहीच महत्त्व नाही ?

आजोबा : यडपटासारखं हसू नये -- कळून हसलं तर ते वेगळं --

उदय : व्हेरी गुड ! माझ्या एक लक्षात येतंय की फार समृध्द व्यक्तिमत्व आहे तुमचं -- बऱ्याच विषयांतलं बरंच कळतं तुम्हाला -- हे ज्ञानाचं भांडार --

आजोबा : म्हणजे तू माझं मूल्यमापन करणार ?

उदय : नाही -- ती चूक करण्याइतकीसुध्दा मला अक्कल नाही -- आजोबा, जरा एक मिनिट उभे राहता का ?

आजोबा : का ?

उदय : राहा तर खरं उभे -- एक मिनिट -- ( आजोबा उभे राहतात. उदय त्यांची काठी आणि पिशवी त्यांच्या हातात देतो. दोन्ही बाजूंच्या विंगांतून दोन माणसे येतात आणि बाक उचलून डाव्या बाजूला जातात. उदय त्यांच्या विरुध्द बाजूच्या विंगेकडे जाऊन एक चौरंग घेऊन येतो. समोर, मागे, मध्यावर ठेवतो.आजोबा उभे.)

उदय : आजोबा या असे -- ( आजोबा नुसते बघत उभे ) या नं असे इकडे --

आजोबा : या चौरंगावर ?

उदय : हं -- बसा तर !

आजोबा : का ?

उदय : बसा हो ! ( म्हणत त्यांना बसवतो. ) हं, छान ! ( लगेच दोन्ही बाजूंच्या विंगांतून अनेक स्त्रीपुरुष येतात. बरोबर मध्ये रेखीव जागा सोडून दोन्ही बाजूंना विभागशीर बसतात. ) व्हेरी गुड ! ( सर्वजण हात जोडतात.' गगन सदन तेजोमय ' सुरू करतात --) हॅलो ! थांबा ! शांतता ! कृपया शांत रहा ! ( लोक गप्प होतात. हात जोडलेलेच.) हातांनाही शांतता द्यायला हरकत नाही --( जोडलेले हात सोडून लोक सैलसर बसतात.) हं, तर सभ्य स्त्रीपुरुषहो, आपली सगळ्यांची आयुष्यं समस्यांनी भरलेली आहेत -- एखादी समस्या आयुष्यातली एक दोन वर्षं खाते तर एखाद्याची एखादी समस्या त्याचं संपूर्ण आयुष्य गिळंकृत करते -- कित्येकांची कित्येक वर्षं अनुत्तरित समस्यांबरोबर जातात -- बरीच पेंडिंग कामं जशी साचलेली असतात तशा बऱ्याच पेंडिंग समस्या आपल्याबरोबर असतात -- या सगळ्या समस्या आपल्याला कुरतडत असतात -- आपलं स्वास्थ्य खराब करत असतात आणि आपल्याला कधीच पूर्णपणे जगू देत नाहीत -- फक्त समस्यांची वेगवेगळी रूपं हीच आपल्या वेगवेगळ्या आयुष्यांची वैशिष्ट्यं म्हणायची का ? या समस्यांचं समाधान कधी होतं की नाही ? समस्याविहीन असं जगता येतं की नाही ? -- असे प्रश्न आपल्याला पडत असतात -- आपण धडपडत असतो, तडफडत असतो --

एकजण : आणि कडमडत असतो --

उदय : तर अशा परिस्थितीत आपण इकडे तिकडे आशेने पाहात असतो -- आधार शोधत असतो -- मार्गदर्शनाचा एखादा किरण सापडतो का हे बघत असतो -- तर या बाबतीत आज एक महत्त्वाचा दिवस आहे -- आपले हे आजोबा इथं आलेले आहेत -- यांच्याकडून आपल्याला काही महत्त्वाचं ऐकायला मिळणार आहे.

एकजण : यांची ओळख काय पण ?

उदय : यांची ओळख अशी करून देण्यापेक्षा, मी असं म्हणेन की यांच्या बोलण्यातूनच आपापल्या कुवतीप्रमाणे आपल्याला यांची ओळख होईल. हे ७५ वर्षं जगलेले आहेत. आणि निरनिराळ्या समस्या हाताळण्याचा यांचा सराव दांडगा आहे. तर आज ते ' समस्याप्रधान आयुष्याचे रहस्य ' या विषयावर बोलतील.

आजोबा : मी कधी म्हणालो की मी या विषयावर बोलीन म्हणून ?

उदय : असूं दे -- बोला तरीसुध्दा --( आजोबा चुळबुळ करतात. ) मला नाही वाटत की या विषयाला तुम्ही कधीच सामोरे गेला नसाल --

आजोबा : ( चुळबुळत ) नाही, सामोरा गेलोय पण...दुसऱ्या एखाद्या विषयावर बोललं तर चालेल का ? की याच विषयावर बोललं पाहिजे ?

एकजण : दुसरा कुठला विषय ?

आजोबा : समजा -- ' किती लोकवस्तीला किती कचराकुंड्या असाव्या ' या विषयावर --?

एकजण : काय सॅनिटरी इन्स्पेक्टर होता काय ?

दुसरा : रिटायर झाले तरी हौस फिटलेली दिसत नाही.

एकजण : कशाला झक मारायला बोलावलं मग इथं ? आता याच विषयावर बोलावं लागेल !

दुसरा : आम्हाला या विषयातलं काहीच कळत नाही ! बोला तुम्ही !

एकजण : हाणा ! काय होत नाही !

आजोबा : बरं, बरं, बोलतो मी -- याच विषयावर बोलतो -- जरा चष्मा पुसू काय ?

काहीजणः पुसा, पुसा-- ( आजोबा चष्मा पुसून पुन्हा लावतात.)

आजोबा : तर ...समस्या कुणाला नसतात ? समस्या नाही असा एक तरी माणूस आहे का ? मला समस्या नाही असं कुणीतरी म्हणू शकेल का ? सर्वांना काही ना काही समस्या या असतातच ...

एकजण : तुमची आत्ताची लेटेस्ट समस्या म्हणजे पुढं काय बोलायचं ही आहे --( काहीजण हसतात.)

आजोबा : मी ७५ वर्षं जगलो -- खूप समस्या आल्या -- खूप गेल्या -- काही तशाच हळूहळू जिरून गेल्या ....आणि अशी ७५ वर्षं उलटली...मनुष्य वेडा कसा होत नाही ? मनुष्य कंटाळत कसा नाही ? ही काय माणसाची जिद्द आहे ? की एखादी अंतर्गत शक्ती आहे ? निसर्ग हे सगळं का घडवतो ? मी कवळी घालूनच बोलतोय - नीट कळतंय का सगळ्यांना --?

काहीजणः हो,हो.

एकजण : ( उभा राहून ) पण आम्हाला असली जनरल भंकस नको आहे -- आम्हाला एक सांगा, समस्या सोडवण्याचा सराव करता येतो का आणि तो कसा करायचा ?

आजोबा : समस्याप्रधान नाटकं पाहता का तुम्ही ?

सर्वजण : हो ऽऽ.

आजोबा : त्यात कसं, काही विशिष्ट स्वभावाच्या व्यक्ती असतात -- त्यांची एक समस्या असते -- तशाच प्रकारची समस्या त्या समाजात इतरही अनेक व्यक्तींमध्ये असते आणि म्हणून ती एक सामाजिक समस्या असते -- मग ते काय करतात, तर त्या त्या व्यक्तींमध्ये काय काय घडत गेलं ते दाखवतात -- शेवट कसा झाला ते दाखवतात -- काही चांगली माणसं असतात, काही वाईट असतात -- काही निरपराध तर काही भोळी असतात -- त्यांचं काय झालं हे सांगताना काय व्हायला हवं होतं ते सुचवतात, चांगलं काय, वाईट काय हे सुचवतात --

एकजण : ( तोच उभा असलेला ) हे काही माझ्या प्रश्नाचं उत्तर नाही --

आजोबा : उत्तरच तर देतोय ! मला असं म्हणायचं होतं की असं सगळं समस्याप्रधान पाहून, वाचून सराव होतोच की नाही ?

एकजण : पण त्या दुसऱ्या व्यक्तींच्या समस्या असतात -- आम्हाला आमच्या व्यक्तिमत्वांच्या समस्यांचा सराव कसा मिळणार ?

अजोबा : बरं, मग तुम्ही मला तुमच्या समस्या सांगा.

एकजण : आम्ही आमच्या वैयक्तिक, गुप्त समस्या तुम्हाला का सांगाव्या ?

आजोबा : अरे, मग म्हणून तर जनरल बोलावं लागतं नं मग ! त्याचा काही उपयोग नसला तरी !!

एकजण : आम्ही सांगायला तयार आहे.

आजोबा : सांगा.

१ : माझी आई सतत आजारी असते.

२ : माझी बहीण मंदबुध्दीची आहे.

३ : माझं अतिशय प्रामाणिक, खरं प्रेम ठोकरलं गेलंय.

४ : कुठल्याच नोकरीत मी टिकत नाही.

५ : मी धंद्यात नुक्ताच असा मार खाल्लाय की उठणं कठीण आहे.

६ : आमच्या घटस्फोटाचा निर्णय फार लांबलाय.

७ : माझ्या वडिलांचा गेली तीन वर्षं पत्ताच नाही.

८ : माझ्या मनासारखं काहीच घडत नाही.

९ : मला एकटेपणा वाटतो.

१० : मला आत्महत्या करावीशी वाटते.

११ : मला श्रीमंतीचं आकर्षण असूनही पैसा मिळत नाही.

१२ : लैंगिक विचारांनी मी पछाडलेला असतो.

१३ : माझ्या बायकोनं मला फसवलं आहे.

१४ : या समाजातल्या भेदाभेदांची मला सतत चीड असते.

१५ : मला कर्ज फार झालंय.

आजोबा : बास, बास ! पण हे सुध्दा सगळं तुम्हाला जनरल नाही वाटत ? त्यापेक्षा जे आपापल्या आयुष्यात यशस्वी होतात त्यांनी समस्या कशा हाताळल्या किंवा ते समस्या कशा सोडवतात हे पाहिलं तरी बरंच काही कळू शकेल.

१ : नुसत्या रुबाबशीर व्यक्तिमत्वाच्या जोरावर काहींच्या समस्या सुटत असतात.

२ : भारदस्त आवाज असला तर फार उपयोग होतो.

३ : आडदांडपणानंही समस्या सुटतात किंवा कमी होतात.

४ : खिशात रामपुरी बाळगण्यानंही समस्या सुटतात.

एकजण : ( उभा राहात, संतापून ) पण हे सगळं जो करू शकत नाही त्याचं काय ? आणि बहुसंख्य लोक असेच असतात. यशस्वी होणाऱ्यांचे नुसते गोडवे गाऊन काय करायचेत ?

आजोबा : हो, हो. सांगतो. बसा. शांत व्हा तुम्ही. तर आज आपण समस्याप्रधान आयुष्य म्हणजे काय हे पाहण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याच्या रहस्याचं उद्या बघू.

१ : झालं ? संपलं ?

२ : थेरडं बोअर करतंय नुसतं -- चला -- ( सगळे कोंडाळं करतात -- हसतात -- आजोबांकडे पाठ करून बसतात. )

एकजण : आजोबा, या तुम्ही ! तुम्ही इकडं आमच्यात या ! तुम्ही तिकडं चौरंगावर बसायचं काही कारण नाही.

उदय : लोक हो, हे आजोबा बरेच स्पष्टवक्तेपणानं बोलत होते त्यामुळं मला असं वाटलं की ते एक अनुभवी सिध्दपुरुष असावेत. पण ते यथातथाच दिसतात याबद्दल मी दिलगीर आहे.

आजोबा : म्हणजे माझा -- ७५ वर्षांच्या म्हाताऱ्याचा तुम्ही निष्कारणच अपमान करू इच्छिता ! हे वाईट आहे !

एकजण : तुम्ही आता ही समस्या सोडवत बसा ! ( इथे स्टेजवर अंधार होतो. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा स्टेजवर कुणीही नाही. उजव्या बाजूने हळूहळू आजोबा येतात. डावीकडून त्यांचा मुलगा येतो. 'च्यायला, मरतही नाही थेरडं लौकर --' असं म्हणतो. आणि उजव्या हाताला बाहेर जातो. नंतर सून येते. आजोबांना पाहताच तिच्या कपाळावर आठ्या पडतात. नाक मुरडते आणि मानेला हिसडा देऊन आत जाते. आजोबा उभे. नंतर कमरेत भरपूर वाकलेली त्यांची बायको येते. त्यांच्याकडे पाहात उभी राहते.)

आजोबा : काय म्हणतीय सांधेदुखी तुझी सोनुबाई ?

सोनुबाई : ( कानामागे हात नेऊन ) आँ ? ( आजोबा क्षणभर पाहतात. ' काही नाही ' असं पुटपुटतात. तिला ' आत जा ' असं नुसतं हाताच्या खुणेनं सांगतात. ती हळूहळू करमेवर हात ठेवून जाते. आजोबा उभे. अंधार होतो. आता प्रकाश पडतो तेव्हा सुरुवातीला होता तसा बाक. आजोबा तसेच त्यावर बसलेले.)

आजोबा : ( स्वगत ) लोक पावसापाण्याच्या गोष्टी सांगतात. लोक वर्षांचे हिशोब मांडतात. संकटं आली, धोके पत्करले किंवा पत्करावे लागले त्या त्या वेळचे भीतीचे प्रकार वगळून अनुभवांचे डोंगर सांगतात. कुणाला यशाचे नगारे वाजवायचे असतात तर कुणाला अपयशाची खापरं कुठंतरी फोडायची असतात. मला स्वतःलाही माझ्या ७५ वर्षांची अशीच कहाणी सांगता येईल. पण तरीही आज माझ्या मनाचा बराचसा भाग निरनिराळ्या समस्यांनी व्यापलेला असतो. पूर्णपणे मी कधी जगलो नाही आणि जगू शकतही नाही. सुभाषितं मलाही माहीत आहेत -' एका वेळी एकाच दिवसाला सामोरे जा, फक्त आजच्या दिवसाला.

कालचा दिवस गेलेला आहे. उद्याचा दिवस अजून यायचा आहे. तो येईल तेव्हा तो आजचा दिवस असेल.' ' आयुष्य ही काही सोडवण्यासाठी दिलेली समस्या नाही, ते एक जगण्यासाठी दिलेलं गूढ आहे.' ' हा क्षण हेच पूर्ण आयुष्य आहे ' -- वगैरे. बरं वाटतं ! सुभाषितांनी खरंच बरं वाटतं. तथ्यांश असतो त्यात. किंवा पूर्णपणे खरीही असतील ती. आपलं नेहमीचं जे काही चाललेलं असतं त्यातून एकदम सैलसर आराम देणारा असा काहीतरी अर्थ असतो त्यांचा. बरं वाटतं. एरवी आपल्यावर अन्याय झाला असं किती प्रकारांनी वाटत असतं आपल्याला. अन्याय सहन करा, किंवा न्याय मिळवण्यासाठी झगडा किंवा ताकदीनं हिसकावून घ्या न्याय...हे सगळं करण्यातही न्यायअन्यायाचे धागेदोरे विणले जातातच. मी कधी कुणाला माझी वैयक्तिक कहाणी सांगत बसत नाही. म्हातारपणाचा हा दोष मी टाळलेला आहे. पण त्यामुळं फारसा काही फरक पडत नाही. फक्त असंबध्दपणाचा एक दोष असेल बहुतेक माझ्यात. पण होतं काय की जे काही चाललेलं असतं त्याला जोडूनच मला काही आठवलेलं असतं -- किंवा एखादा विचार येतो. ते त्याला जोडूनच कसं आहे ते मला माहीत असतं. पण दुसऱ्यांना माहीत नसतं. म्हणून मग त्यांना ते असंबध्द वाटतं. पण मग ते आपण फारसं मनावर घ्यायचं नाही असं मी ठरवून टाकलेलं आहे. काय काय मनावर घेणार हो ? आपल्याला रोग आहे तर औषध हे घ्यावंच लागणार. कोण सुटलंय स्वतःच्या शरीराच्या मागण्यांतून ? कोण झालंय देहातीत ? (अंधार होतो. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा स्टेज रिकामे. एका बाजूनं उदय आणि दुसऱ्या बाजूनं एक तरुण येतो.)

उदय : हा झाला गण. आता गौळण व्हायला पाहिजे.

तरुण : गौळण होणार नाही.

उदय : का ?

तरुण : एकीला दिवस गेलेत आणि दुसरीची जरा अडचण आहे.

उदय : ह्यॅ ! असल्या गौळणी काय कामाच्या ?

तरुण : मग गौळणी कशा पाहिजेत ?

उदय : सुंदर, शेलाटया, तळपणाऱ्या आणि चपळ.

तरुण : सुंदर ? म्हणजे कशा ?

उदय : डोळे सुखावले पाहिजेत, मनाला संतोष झाला पाहिजे. बघत राहावंसं वाटलं पाहिजे. आपण त्यांच्याकडे बघताना आपल्याकडे कुणी बघत तर नाहीय ना असं वाटलं पाहिजे.

तरुण : म्हणजे त्यांच्याकडे बघताना आपल्यात अपराधी भावना आली पाहिजे.

उदय : आणि त्या नाचताना, त्यांच्या आविर्भावांनी शरीराचा कण न् कण लखलखला पाहिजे.

तरुण : विसरा ते दिवस. स्त्री ही एक उपभोग्य वस्तू मानण्याचे.

उदय : ते बरोबर आहे, पण आकर्षण तर पाहिजेच नं स्त्री-पुरुषांत !

तरुण : ठीक आहे, ठीक आहे, या गौळणी आल्या, आपण जाऊ !
( ते जातात. दोन देखण्या गौळणी येतात. ' मेरे हाथों में नौ नौ चूडियाँ रे ' या गाण्यावर नाच करतात.)

प्रेक्षक : ( चिडून स्टेजवर आलेला ) थांबा ! ( नाच थाबतो. ) हे काय चाललंय ? वेळ घालवताय तुम्ही नुसता ! एवढा महत्त्वाचा विषय घेतलात तुम्ही पण अजून मुद्याला हात घालणं जमलेलं नाही तुम्हाला -- नुसते आजूबाजूलाच फिरताय -- फसवणूक आहे ही -- थेरडं कसं गुरू झालं आणि पचकलं तशीच तुमची अवस्था होणार असं दिसतंय --

उदय : ( घाईनं येतो.) काय, काय झालं ?

प्रेक्षक : ज्या मुद्यावर आपण काही देऊ शकत नाही तो मुद्दा घेतलाच कशाला तुम्ही ?

उदय : आमच्याही काही समस्या आहेत !

प्रेक्षक : कसल्या समस्या न् काय --

उदय : ठीक आहे. आम्ही लगेच वग सुरू करतोय. त्यातनं काही मिळतं का बघा.( स्वतःशी) बहुतेक नाहीच काही मिळणार म्हणा !

प्रेक्षक : कुठलं काय न् काय !

उदय : आयुष्य जगायला सुरुवात केल्यावरच कळलं पाहिजे की --

प्रेक्षक : आमचे दोष नका काढू. दाखवा काय ते चटकन -- ( जातो. )

उदय : ( गौळणींना ) चला ! ( जातात. अंधार होतो.पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा हॉटेलमधले एक टेबल. प्रदीप हा

काळ्या रंगाचा पण स्मार्ट तरुण -- २५ -- आणि शर्मिला ही गोऱ्या रंगाची देखणी तरुणी --२२-- प्रवेश करतात. शर्मिला ही प्रदीपपेक्षा थोडी अधिक उंच आहे. बसतात. वेटर पाण्याचे दोन ग्लास आणून ठेवतो.जातो.)

प्रदीप : आपण एका ऑफिसात काम करतो पण बोलणं असं फारसं कधी होतच नाही.

शर्मिला : हो नं --

प्रदीप : म्हणून म्हटलं, चहा तरी घ्यू .. काय घेणार ?

शर्मिला : चहाच. कारण जायला हवं मला लौकर.

प्रदीप : अच्छा ! ( काही क्षण ) एक सांगू का तुम्हाला ?

शर्मिला : हं ?

प्रदीप : समोर मी आहे म्हणून तुम्ही असं म्हणालात.

शर्मिला : काय ?

प्रदीप : लौकर जायला हवं म्हणून.

शर्मिला : मी समजले नाही.

प्रदीप : सांगतो. समोर जर एखादा रुबाबशीर व्यक्तिमत्वाचा देखणा तरुण असता तर कदाचित तुम्ही असं म्हणाला नसतात.( वेटर येतो.) दोन चहा.( जातो.)

शर्मिला : नाही, नाही, असं काही माझ्या डोक्यातही नव्हतं -- तुम्हाला उगीचच असं वाटतं.

प्रदीप : तुम्ही असंच म्हणणार. ते बरोबरही आहे. काळाच्या ओघात तुमची चूक नाही.

शर्मिला : तुम्ही निष्कारण स्वतःकडे कमीपणा घेताय.

प्रदीप : तुम्ही मला एक सांगा, रुबाबशीर व्यक्तिमत्वाचं महत्त्व असतं की नाही सगळीकडे ? तशा लोकांचा प्रभाव पडतो की नाही ? कुणाच्या डोक्यात असो, नसो ?

शर्मिला : हं -- हे असतंच थोडंफार.

प्रदीप : काय अर्थ असतो त्याला ? कामाच्या कुवतीत, जबाबदारी घेण्याच्या बाबतीत किंवा निरनिराळ्या परिस्थिती हाताळण्याच्या बाबतीत यामुळं काही फरक पडतो का ? व्यक्तिमत्वाचा बाहेरचा, मुख्य दिखाऊ भाग हा फक्त जन्मानं, अपघातानं मिळालेला असतो. जन्मानं मिळालेल्या गोष्टींचा लोकांनी किती फायदा घ्यावा ? दुसऱ्यांच्यावर किती अन्याय करावा ? ( वेटर चहा ठेवून जातो.)

शर्मिला : मी असा कधीच विचार केला नव्हता.

प्रदीप : तुम्हाला गरज काय असा विचार करण्याची ? तुम्ही सुंदर आहात, देखण्या आहात.

शर्मिला : असंही मी काही सारखं लक्षात ठेवत नाही.

प्रदीप : गरज काय ? आपोआपच प्रस्थापित सत्य असतं ते. मी तुम्हाला उदाहरण देऊन सांगतो. पूर्वी सतीची चाल होती. लोकांना बरोबर वाटत होतं ते. ही अन्यायकारक चाल ही लोकांची मानसिक सवय होती. हे चुकीचं आहे असं कुणीतरी म्हणायला सुरूवात केली आणि ते खरोखरच अनैसर्गिक, चुकीचंच असल्यामुळं ती चाल बंद झाली. आज कुणीही सोम्यागोम्या म्हणतो की सतीची चाल वाईट होती. चुकीच्या, अन्यायकारक मानसिक सवयी बदलण्याचा फक्त प्रश्न असतो. तसंच स्त्रीपुरुषांमधली अनुरूपता ही स्वभाव, कर्तृत्व यांवर आधारलेली हवी ; रंग आणि उंची यांच्यावर नव्हे.

शर्मिला : ( थोडं हसून ) तुम्ही फार वेगळे विचार करू शकता. हे असं कुणाच्या डोक्यात येत नाही. चलायचं ?

प्रदीप : जाऊ, पण मुख्य ते सांगायचं राहिलं आहे.

शर्मिला : काय ?

प्रदीप : मी तुम्हाला अनुरूप आहे असं मला वाटतं आणि एका आत्मविश्वासानं मी तुम्हाला सांगू इच्छितो की माझं तुमच्यावर प्रेम आहे.

शर्मिला : ओह् ! आभारी आहे.

प्रदीप : पण तुमच्या प्रतिसादाशिवाय माझ्या प्रेमाची पूर्तता होत नाही.

शर्मिला : तुम्ही जसं माझ्यावर प्रेम करण्याचं स्वातंत्र्य घेतलेलं आहे तसंच स्वातंत्र्य मलाही ठेवलं पाहिजे --नाही का ? दोन्ही व्यक्तींचे जेव्हा सादप्रतिसाद जुळतील तेव्हाच प्रेमाची पूर्तता होणार. त्याला काय इलाज आहे ?

प्रदीप : तुम्ही प्रस्थापित परंपरावाद्यांची भाषा बोलताहात.

शर्मिला : मी माझी भाषा बोलतेय. पण तुम्हाला कुठल्याही प्रकारे दुखवायची माझी इच्छा नाही.

प्रदीप : माझा रंग आणि उंची यांव्यतिरिक्त कोणती कारणं आहेत ?

शर्मिला : तसा मी विचारही केलेला नाही.

प्रदीप : पण आता करत का नाही ?

शर्मिला : माझ्या मानसिक क्षेत्रात इतके मोठे बदल करायचा प्रयत्न मी कुणाला करू देत नाही. सॉरी.

प्रदीप : म्हणजे तुम्ही एका परंपरागत सवयीच्या गुलाम राहू इच्छिता. चुकीच्या गोष्टी बदलायची तयारी नाही तुमची.

शर्मिला : तुम्हाला न दुखवण्याची मी काळजी घेतली तरी तुम्ही मात्र मला दुखवताहात.

प्रदीप : सॉरी. पण हे असले चुकीचे मानसिक किल्ले पाडल्याशिवाय मला समाजात योग्य विचार प्रस्थापित करता येणार नाहीत.

शर्मिला : मी वाद टाळू इच्छिते. चला.( जातात. अंधार.पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा समोर बाक. उदय कुणाची तरी वाट पाहतोय. काही क्षणांनी प्रदीप येतो. त्याला कल्पना नाही.)

उदय : अहो मिस्टर, शुक्--शुक् -- ( प्रदीप थांबतो, पाहतो.) तुम्ही प्रदीप का ?

प्रदीप : हो.

उदय : मी उदय. शर्मिलाचा भाऊ. मला जरा तुमच्याशी बोलायचं होतं, तुमची हरकत नसेल तर.

प्रदीप : ( बसून ) बोला.

उदय : शर्मिलाशी तुम्ही काही बोलला होतात, त्याबद्दल बोलायचं होतं.

प्रदीप : बोला नं मग, मला कल्पना आहे. आणि हल्ली प्रेम ठोकरणाऱ्या काही मुलींचे खून झालेत त्यामुळं सगळ्यांच्यातच एक नम्रपणा आलेला आहे. तसला नम्रपणा मला दाखवायची गरज नाही, कारण मी तसला प्रेमवीर नाही.

उदय : मला शर्मिलानं काही गोष्टी सांगितल्यायत.

प्रदीप : ते तर उघडच आहे.

उदय : मला फक्त एक विचारायचं होतं की मुलींनी जर पुरुषांच्या दिसण्याला महत्त्व देऊ नये असं तुमचं मत आहे तर मग तुम्ही स्वतः सुंदर मुलींवर प्रेम करायचा प्रयत्न का करता ?

प्रदीप : तुमचा थोडा गैरसमज झालेला आहे. इतर सर्व दृष्टींनी आम्ही एकमेकांना योग्य आहोत. म्हणून मला त्यांच्याबद्दल प्रेम वाटतं. योगायोगानं त्या रूढ कल्पनांप्रमाणे सुंदरही आहेत इतकंच. पण दिसणं हा निवडीत महत्त्वाचा फॅक्टर ठरू नये असं माझं मत आहे.

उदय : पण कुठले फॅक्टर्स असावे, नसावे हा ज्याचात्याचा प्रश्न आहे, नाही कां ?

प्रदीप : ते बरोबर आहे, पण काही चुकीच्या मानसिक, सामाजिक सवयी असतील तर त्या बदलण्यावरही माझा विश्वास आहे. अनुरूपपणाच्या चुकीच्या कल्पनांमुळे समाजात वर्षानुवर्षं काहीजणांवर अन्याय होत आहे.

उदय : यासाठी तुम्ही काय चांगल्या दिसणाऱ्या व्यक्तींना भेटून हे सांगत राहणार का ?

प्रदीप : सध्या तर मी फक्त माझीच समस्या हाताळतोय. कदाचित मला कामाच्या कक्षा रुंदावण्याची गरज पडेल असं वाटतं.

उदय : ती जर होकार द्यायला तयार नसेल तर काय ?

प्रदीप : नकार द्यायला काहीच हरकत नाही, पण विचारही न ऐकण्याचा भित्रेपणा त्या दाखवणार नाहीत ही एक शक्यता आहे.

उदय : समजा विचारही ऐकायला नकार दिला तर ?

प्रदीप : मी याबद्दल एक चळवळ उभारून लोकजागृती करण्याच्या विचारात आहे.

उदय : पण या एकूण सादप्रतिसादात उत्स्फूर्तपणे एखादी व्यक्ती आवडावी लागते. यात पटवून देण्याचा काय भाग आहे ?

प्रदीप : मी तुम्हाला दोष देत नाही. तुमचे विचार असेच असणार. पण यात उत्स्फूर्तपणा वगैरे काही नसतो. आवडीनिवडी फिक्स करण्याच्या काही रुळलेल्या सवयी असतात इतकंच.

उदय : मग रोगी, महारोगी, कुष्ठरोगी यांच्या बाबतीत कसा विचार करावा असं तुमचं म्हणणं आहे ?

प्रदीप : व्यक्ती सुदृढ आहे की नाही ते जरूर पाहावं. ते शास्त्रीय सत्य आहे. रोगी माणसाशी सुदृढ व्यक्तीनं लग्न करावं असं माझं मत नाही. माझा रोख फक्त मानसिक सवयींवर आहे.

उदय : चळवळ उभारा तुम्ही.

प्रदीप : सल्ल्याबद्दल आभारी आहे. जाऊ का ?

उदय : जा तुम्ही. तुमच्या विचारांचा प्रचारही करा पण आता यापुढं शर्मिलाच्या नादी लागू नका.

प्रदीप : तुम्ही फार चीप रूप देताय या सगळ्याला. आणि त्या जर विचारही ऐकायला भीत असतील तर माझा आग्रह नाही. मी काही बलात्कार किंवा खून करणारा माणूस नाही.

उदय : ठीक आहे. ती विचारही ऐकायला भिते असं समजा आणि विषय सोडून द्या.

प्रदीप : हे फक्त त्यांना सांगू द्या.( जातो. उदय पाहतो. जातो. अंधार होतो, पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा ऑफिसचे दृश्य. एक शिपाई वस्तू, फायली नीट ठेवतो आहे. एकदोन माणसे येऊन आपापल्या जागी बसतात. मग शर्मिला येते. ती डाव्या हाताच्या टेबलखुर्चीकडे जाते. बसते.ती टायपिस्ट आहे. नंतर प्रदीप येतो.)

प्रदीप : ( तिच्या टेबलाजवळ थांबून ) हं, काय, कसं काय ? ( ती पाहते पण बोलत नाही. ) रागावू नका. पण विचार करायला भिऊ नका इतकंच माझं म्हणणं आहे.

शर्मिला : ऑफिसच्या कामाच्या वेळात मला अडथळे आवडत नाहीत.

प्रदीप : ठीक आहे, ठीक आहे.( जाऊन उजव्या हाताला आपल्या जागेवर बसतो. काही फाईली पाहू लागतो. असे काही क्षण जातात. मग शंकर येतो. इकडेतिकडे पाहतो. थेट प्रदीपच्या टेबलाकडे जातो. एक खुर्ची ओढून बसतो. त्या दोघांचे संवाद फक्त त्यांच्यातच. दुसऱ्यांना ऐकू जात नाहीत.)

शंकर : तुम्ही प्रदीप का ?

प्रदीप : हो, पण तुम्ही कसं ओळखलंत ?

शंकर : तुम्ही कुठंही असला तरी तुम्हाला शोधून काढणं काही अवघड नाही. आपण जे बोलतोय ते फक्त तुमच्यामाझ्यात आहे. माझं नाव शंकर. हे नाव अर्थातच मी खोटं सांगतोय. शर्मिलाच्या बाबतीत बोलायचंय. ती मला ओळखत नाही. कळतंय ?

प्रदीप : हं.

शंकर : मी खिशात रामपुरी बाळगणारा माणूस आहे. तिच्या नादी लागायचं नाही. कळालं ?

प्रदीप : मी काय त्यांना कसली सक्ती केली की स्पर्श केला की काही चुकीचे शब्द वापरले ? भावना व्यक्त करायला आणि विचारविनिमय करायला काय बंदी आहे ?

शंकर : मी तुमच्या विचारांची दिशा बदलून देऊ शकतो.

प्रदीप : कसं काय ?

शंकर : तुमचं तंगडं तोडलं नं की तुम्ही काळ्या माणसांचे विचार सोडून लंगड्या माणसांचे विचार कराल.

प्रदीप : तुम्ही धमकीची भाषा वारताय.

शंकर : समजतंय म्हणजे !

प्रदीप : मी कुणालाही उपद्रव दिलेला नाही.( एक शिपाई येतो. शर्मिलाला साहेबांनी आत बोलावल्याचं सांगतो. जातो. शर्मिला जाते. ) त्यांनी जर विचारही करायला नकार दिला तर मी बोलणार नाही. पण त्या सांगतील नं ! तुम्ही का मनावर घेताय एवढं ? ज्यामुळं असल्या धमक्या द्याव्या तशा प्रकारचं फालतू मी वागलेलो नाही आणि वागणारही नाही. तुमचा काय संबंध पण ?

शंकर : ( हसून ) मला असलं विचारायचं कुणीही डेअरिंग करत नाही. एखाद्या माणसाबरोबर मी आहे असं दाखवण्यासाठी त्याच्या बरोबर फिरण्याचे मी पाचपाचशे रुपये घेतो. एरियातल्या निवडक नावांमध्ये चौकीवर नाव आहे आपलं. तुम्हाला माहिती नाही म्हणून सांगितलं. सरळ सांगून तुम्हाला कळेल म्हणून सरळ सांगितलं.( शर्मिला येते. आपल्या जागेवर बसते. तिच्यावद्दल बोलणे चालल्याची तिला काहीही जाणीव नाही.) पुन्हा जर का मला याबाबतीत लक्ष घालावं लागलं आणि तुम्हाला भेटावं लागलं तर वाईट होईल. कळल !

प्रदीप : अच्छा !?

शंकर : चुपचाप राह्यचं ! ( उठतो. जातो. काही क्षण. शांत. ऑफिसचे कामकाज.प्रदीपही कामाला लागू पाहतो. अंधार. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा तोच सुरुवातीचा बाक. त्याच्या डाव्या कडेला आजोबा बसलेले. बाकाच्या उजव्या हाताचा भाग मोकळा. काही क्षण असे जातात. मग शंकर सहज आल्यासारखा येतो. थोडे अंतर सोडून बाकावर बसतो. आजोबा पाहतात पण काही बोलत नाहीत. तोही काही बोलत नाही. काही क्षण असे जातात.)

आजोबा : काय उद्योग काय करता ?

शंकर : लोकांचे चाललेले उद्योग बिघडवणे.

आजोबा : लोक मारत नाहीत ?

शंकर : आपल्याला फक्त तो एक परमेश्वर मारू शकेल. बाकी कुणाची हिंमत होणार नाही.

आजोबा : तुम्ही काय कॅबिनेटमध्ये आहात काय ?

शंकर : कॅबिनेट ? कॅबिनेट आमच्या भरंवशावर जगतं !

आजोबा : हं ? एवढे आहात तरी कोण तुम्ही ? फार मोठी जोखीम दिसते तुमच्यावर.

शंकर : तुम्ही काय करताय इथं ?

आजोबा : हा माझा ठरलेला बाक आहे. या बाकावरचीसुध्दा हीच कडेची जागा. सवयच एक. बरं वाटतं.

शंकर : समजा रोज तुमच्याआधी या जागेवर दुसराच एक माणूस येऊन बसू लागला तर काय ?

आजोबा : तर मग दुसरीकडं बसावं लागेल. पण सवय मोडल्याचं दुःख होईल. अस्वस्थ वाटेल. शेवटी कदाचित मी त्या माणसाला विनंतीसुध्दा करीन की बाबा मला तिथं बसू दे म्हणून.

शंकर : त्यानं नाही ऐकलं तर ?

आजोबा : मग काय करणार ? इलाज नाही.

शंकर : कोथळा बाहेर काढायचा भडव्याचा. मला सांगा तुम्ही.

आजोबा : छे छे. एवढ्याशा गोष्टीसाठी इतकं ? नाही.

शंकर : मग लोक तुमच्या सवयी मोडत राहतील आणि तुम्ही नुसते सहन करत बसाल.

आजोबा : काय करणार मग ? महानगरपालिकेचा बाक आहे -- सर्वांना मोकळा आहे.

शंकर : भित्रे आहात.

आजोबा : गेली अशीच ७५ वर्षं. अजूनही जातील.

शंकर : तुम्हाला पुढं अजून बरीच वर्षं जगायची हौस असते म्हणून तुम्ही आत्ता सहन करता.

आजोबा : तू नाही सहन करत ?

शंकर : आपल्याला उद्याची पर्वा नसते. त्यामुळं आज आपण म्हणू तसंच झालं पाहिजे. शिवाय उद्या जगायची हौस असलेले सगळे लोक आपल्याला घाबरतात. उद्याची इच्छा ठेवली की बुळचटच होतो माणूस.
( आता उजव्या हाताच्या मोकळ्या भागात काही काळेकुळकुळीत लोक टेबलखुर्च्या मांडताहेत. एका सभेची तयारी चालू आहे. प्रदीप देखरेख करतो आहे. सभेसाठी काळे स्त्रीपुरुष जमू लागतात. काही बाकासमोरून जातात. बरेच काळे स्त्रीपुरुष जमतात.)

आजोबा : मी जातो आता. अंधार पडायला लागला.

शंकर : अहो आजोबा, अंधार पडायला अवकाश आहे अजून -- इथं सगळ्या काळ्या लोकांची सभा आहे म्हणून तुम्हाला वाटतंय तसं --

आजोबा : काळ्या लोकांची सभा ?

शंकर : बघा तर गंमत ! त्यांचा प्रदीप नावाचा एक पुढारी आहे, तो काय बडबडतोय ते बघायला आलोय मी. काही दिवसांपूर्वी जोरदार दम भरला होता मी त्याला.

आजोबा : का बरं ?

शंकर : तुम्ही बघा आणि ऐका आता गुपचुप. कळेल तुम्हाला. ( खुर्च्या लावणारा एक काळा माणूस --'' पुढल्या खेपेला लाईटची ॲरेंजमेंट करू -- म्हणजे कोणकोण आलंय ते दिसेल रात्रीसुध्दा -- '' नंतर दोनतीन वजनदार काळे लोक -- एखादी काळी स्त्री -- खुर्च्यांवर बसतात. त्यात प्रदीपही आहे.)

प्रदीप : ( उभा राहून ) मित्रहो, काळ्या रंगाच्या लोकांची ही हिंदुस्थानातली पहिली सभा आहे. आकारानं जरा लहान आहे पण ही सुरुवात आहे. विचार हे वाढत जातील आणि शेवटी सर्वांना सत्य मान्य करावं लागेल. काळ्या रंगाला समाजात कमी लेखलं जात असल्यामुळं आपल्याला निष्कारणच स्वतःकडे कमीपणा घ्यावा लागतो. हे थांबलं पाहिजे. काळ्या रंगाबद्दलच्या वाईट कल्पनांचं निर्मूलन झाल्याशिवाय आपल्याला नॉर्मल आयुष्य जगता येणार नाही. आणि हेच साध्य करण्यासाठी आपण ' काळा हल्ला ' ही संघटना स्थापन केलेली आहे. या संघटनेचे सभासद आणि कार्य वाढवणं हे आपणा सर्वांचं काम आहे. तरी या बाबतीत कुणाला काही बोलायचं असेल, सूचना करायच्या असतील तर जरूर इथे समोर येऊन बोलावं. औपचारिकपणा टाळून डायरेक्ट आपले विचार मांडावे अशी विनंती आहे.

शंकर : ( आजोबांना ) हाच तो भडवा -- एका मुलीच्या मागं लागला होता की माझ्याशी लग्न कर म्हणून -- हलकट साला ! आज ना उद्या हे मरतंय माझ्या हातून --

आजोबा : छे छे, हे चांगलं नाही.

शंकर : बघा, बघा.( एक काळा माणूस हात वर करतो, प्रदीप त्याला बोलावतो. तो येतो.)

वार्ताहर : मी काळाकुट्ट असल्याचं तुम्हाला दिसत असेलच. या संघटनेला माझा पूर्ण पाठिंबा आहे. मी व्यवसायानं वार्ताहर आहे. या संघटनेसाठी रक्ताची शाई करून मी पांढऱ्यावर काळं करत राहीन हेच एक महत्त्वाचं आश्वासन मी या प्रसंगी देतो.( टाळ्या. )

आजोबा : ( शंकरला ) म्हणजे याचं रक्तही काळं आहे --

शंकर : पुढं बघा.

वार्ताहर : लोक म्हणतात काळा रंग अंधारात दिसत नाही. अरे पण प्रकाशात दिसतो की नाही ? इतर रंगांबरोबरच काळाही एक रंग आहे. त्याला कमी का लेखता ? काळ्या रंगानं आजपर्यंत खूप प्रकाश दिला आहे. आणि यापुढेही देत राहील. त्यामुळं या संघटनेसाठी ' काळे दिवे ' या नावाचाही विचार व्हावा अशी माझी सूचना आहे.( टाळ्या. जाऊन बसतो. एक काळी स्त्री येते.).

काळी स्त्रीः काळ्या रंगाची आई काळा रंगच प्रसवते अशी खात्री वाटते लोकांना. पण काळा रंग वाईट का ? या रंगाला घाबरता का तुम्ही ? उलट हा रंग इतर सगळे रंग सामावून घेत असला पाहिजे. तो कोणत्याच किरणांचं परावर्तन करत नाही म्हणून काळा वाटत असावा. आणि असा सर्व रंग सामावून घेणारा हा रंग सुंदर नसतो असं का म्हणायचं ? उलट या रंगाला सर्वात सुंदर रंग म्हणायला हवं.( टाळ्या. जाते. एक काळा म्हातारा येतो.)

काळा म्हाताराः परदेशात काळे म्हणून हिणवले गेल्यावर अपमानित होणारे लोक स्वतःला गव्हाळ समजतात आणि आपल्या देशातल्या प्युअर काळ्या लोकांना तशीच कमीपणाची वागणूक देतात हे कितपत बरोबर आहे ? ( टाळ्या. जातो. एक काळा माणूस -- काळी टोपी, काळा कोट, पांढरे धोतर, काळ्या मिशा अशा अवतारात येतो.).

काळी टोपीवालाः भाषेची गंमत पहा. दृष्ट लागू नये म्हणून काळी तीट लावतात किंवा गालबोट. त्याच्यावरून एखाद्या चांगल्या गोष्टीला गालबोट लागलं असा शब्दप्रयोग आला. त्याचप्रमाणे -- काळा बाजार,कृष्णकृत्य,काळा पैसा,तोंड काळं करणे, कालिमा लागणे, काळा दिवस, मनात काळोख दाटणे, तमसो मा ज्योतिर्गमय -- हे सगळं काय आहे ? यावरून काय दिसून येतं ? यावरून हेच सिध्द होतं की काळ्या रंगाला हीन लेखण्याची ही परंपरा शेकडो वर्षांची जुनी आहे. ही मोडून काढणं तसं सोपं नाही. भाषेतल्या अशा प्रकारच्या शब्दप्रयोगांचं उच्चाटन झालं पाहिजे नाहीतर ही चुकीची मानसिक सवय कधीही नष्ट होणार नाही.( काळे लोक माना डोलावतात, हसतात, टाळ्या वाजवतात. तो जाऊन बसतो. एकदोघंजण फार महत्त्वाचा मुद्दा मांडला म्हणून त्याचं कौतूक करतात. नंतर एक काळा तरुण पांढऱ्या शुभ्र पोषाखात येतो.)

काळा तरुणः माझी तर अशी सूचना आहे की काही टक्के का असेना पण गोऱ्या रंगाचे सुंदर स्त्रीपुरुष काळ्या रंगाच्या कुरूप समजल्या जाणाऱ्या स्त्री-पुरुषांसाठी कायद्यानं राखीव ठेवावे. त्याशिवाय समाजातली ही भेदभावाची भावना जाणार नाही. ( सगळे गप्प बसतात. कुणीही टाळ्या वाजवत नाही.)

आजोबा : बिचाऱ्यांवर अन्याय होतो हे खरं आहे. पण तो अन्याय घालवायची ही धडपड अवघड आहे.

काळा तरुणः माझा मुद्दा कुणाला पचनी पडलेला दिसत नाही. पण बघा. विचार करा.( जातो. एक पांढऱ्याशुभ्र केसांची काळी म्हातारी येते.)

काळी म्हातारीः सगळं आयुष्य या काळेपणातच गेलं. नवरा काळा, पोरंही काळी, आता केस पांढरे झाले. का झाले ? शक्ती कमी झाली म्हणून. म्हणून काळा रंग म्हणजे शक्ती एवढं लक्षात ठेवा - ( टाळ्या. जाते. प्रदीप इकडे तिकडे पाहतो. अजून कुणी बोलू इच्छितंय का याचा शोध घेतो. कुणी नाही म्हटल्यावर स्वतः उभा राहतो.)

प्रदीप : या पहिल्या सभेला अपेक्षेपेक्षा फारच चांगला प्रतिसाद मिळाला आहे. याचा अर्थच असा की या अन्यायाची बोचणी सतत आपल्या मनात आहे पण कृती घडत नव्हती. ही कृतीची नांदी आहे. इथं निरनिराळे लोक बोलले. त्यांनी आपापले विचार मांडले, काही सूचना केल्या. प्रथम याबाबतीत थोडक्यात बोलतो. संघटनेचं नाव ' काळा हल्ला ' हे तात्पुरतं दिलेलं आहे. पण मलाही ते पसंत नाही. कारण

'हल्ला' हा शब्द शुत्रुत्व वाढवणारा आहे. आपल्याला शत्रुत्व वाढवायचं नसून एकी साधायची आहे. म्हणून नाव बदलावं लागेल हे तर उघडच आहे. पण ' काळे दिवे ' या नावाची सूचना मला स्वतःला तितकीशी पसंत नाही. कारण आपल्या विचारांना विरोध करणाऱ्या लोकांना ' काळे दिवे ' या नावामुळं चेष्टा करायची संधी मिळेल. नाव हे फार विचारपूर्वक ठरवावं लागेल. ते अर्थात आपण करूच. दुसरं असं की कुणीतरी इथं असं म्हणालं की काळा रंग हा सगळे रंग सामावून घेतो आणि किरणांचं परावर्तन करत नाही. याबाबतीतलं शास्त्रीय सत्य मलाही माहीत नाही. पण ते नीट माहीत करून घेतल्याशिवाय असले मुद्दे मांडून निष्कारण आपली बाजू कमकुवत करून घेऊ नये असं मला वाटतं. भाषेबद्दलचे, परदेशातल्या अपमानाचे वगैरे असे काही मुद्दे इथं फार छान मांडले गेले. पण राखीव टक्केवारीचा मुद्दा मला संघर्ष वाढवणारा वाटला. कारण सजीव माणसं राखीव ठेवा म्हणणं अवघड आहे. मुद्दाम संषर्ष न वाढवता हळूहळू आपले विचार आपल्याला प्रसृत करायचे आहेत...मला स्वतःला आलेला एक अनुभव सांगतो. माझं एका मुलीवर प्रेम आहे. रूढ अर्थानं ती सुंदर आहे. मी माझे विचार तिला सांगितले. विचार ऐकायचं किंवा विचारांना विरोध करायचंही ती टाळते आहे. तिनं काही म्हणायच्या ऐवजी या संदर्भात दुसरेच लोक मला भेटले. एकानं तर मला उघडउघड धमकी दिली. पण असल्या धमक्यांना घाबरून आता आपण जगणार नाही. दबलं जाण्याचे, अन्याय सहन करण्याचे दिवस आपल्याला लौकरच संपवायचे आहेत.( टाळ्या ) यासाठी आपण कुणालाही घाबरणार नाही अशी आज प्रतिज्ञा करू या ! म्हणा," मी कुणालाही घाबरणार नाही !''

सगळे काळेः मी कुणलाही घाबरणार नाही.

प्रदीप : ठीक आहे. आजची सभा संपलेली आहे. यापुढच्या सभेची सूचना तुम्हाला योग्य वेळी मिळेलच. पण यापुढची सभा ही प्रत्यक्ष कार्याची रूपरेषा ठरवण्यासाठी असेल एवढं मी सांगू इच्छितो. सर्वांचे आभार.
( काळ्यांचा जमाव पांगू लागतो. काहीजण खुर्च्या-टेबले उचलू लागतात.)

शंकर : मला चायलेंज देतोय भडवा ! घाबरत नाही म्हणतो ! मला घाबरत नाही ! बघतो साल्याला !

आजोबा : जाऊं द्या हो, त्यांच्या त्यांच्या पध्दतीनं करू द्या प्रयत्न त्यांना. काय होणार आहे ?

शंकर : पण मला सांगतो ? घाबरत नाही ?
( लोक गेलेले. प्रदीप जाऊ लागतो. अचानक शंकर उठतो. रामपुरी काढतो. भसाभस वार करतो. प्रदीप कोसळतो. कोसळताना ओरडतो. नंतर नुसता तडफडत पडून राहतो. आवाज नाही. आजोबा अवाक्.)

शंकर : ( आजोबांना ) कुठं बोललास तर तुझीपण हीच गत करीन म्हातारड्या ! चल उठ ! पळ ! ( आजोबा पिशवी, काठी घेऊन जीव मुठीत धरून पळ काढतात. शंकर, तडफडत पडलेल्या प्रदीपकडे पाहतो.) घाबरत नाही ! हुं ! ( थुंकतो आणि जातो. प्रदीप पडलेला. अंधार होतो. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा पोलीस चौकी. इन्स्पेक्टर काळा. उदय, शर्मिला आणि आजोबा.)

इन्स्पेक्टरः घटना फार वाईट घडलीय. शिवाय तो नवीनच स्थापन होत असलेल्या काळ्या लोकांच्या संघटनेचा नेता होता. आपल्या देशात विचारस्वातंत्र्य असून अशा घटना घडतात हे वाईट आहे. असो. तर शर्मिलाबाई आम्हाला अशी माहिती मिळाली आहे की प्रदीपचं तुमच्यावर प्रेम होतं आणि त्यानं त्याचे विचार तुम्हाला सांगितले होते. परंतू अर्थातच तुम्हाला त्यातलं काहीच आवडत नव्हतं. याबाबतीत त्याला कुणीतरी धमकी दिली होती असंही कळलं आहे. तुमचं दुसऱ्या कुणावर प्रेम आहे का आणि असल्यास त्याला तुम्ही प्रदीपबद्दल सांगितलं होतं का ?

शर्मिला : अजून तरी माझं कुणावरही प्रेम म्हणजे स्त्रीचं पुरुषावर असतं तसलं नाही. मी परंपरागत पध्दतीनं, आईवडीलांच्या पसंतीनं लग्न करणार आहे.

इन्स्पेक्टरः नाही, ते करा तुम्ही -- तुमची मर्जी आहे शेवटी -- पण तुम्ही प्रदीपबद्दल -- कुणाला बोलला होता का ?

शर्मिला : हो. उदयला बोलले होते. भाऊ आहे तो माझा.

इस्पेक्टरः ते ऐकून उदय चिडला होता का ?

शर्मिला : नाही, चिडला नव्हता -- मी बोलीन त्याच्याशी एवढंच तो म्हणाला होता.

इन्स्पेक्टरः तुमच्याशी पुन्हा बोलू नये म्हणून प्रदीपला कुणीतरी धमकी दिली होती. तो धमकी देणारा कोण असू शकेल ?

शर्मिला : मला काही अंदाज करता येत नाही.

इन्स्पेक्टरः या माणसाचा म्हणजे प्रदीपचा आपल्याला त्रास होण्याची शक्यता आहे -- हे टळलं तर बरं असं काही

तुम्हाला वाटत होतं का ?

शर्मिला : मला तो आवडण्याचा प्रश्नच नव्हता. पण तो शांत, सौजन्यशील आणि निरुपद्रवी होता. मला त्याचा विशेष काहीच त्रास झाला नसता.

इन्स्पेक्टरः बरं उदय, तुझं आणि त्याचं बोलणं झालं का ?

उदय : हो.

इन्स्पेक्टरः काही वादावादी, बाचाबाची झाली का ?

उदय : नाही. त्याची विचार मांडण्याची पध्दत सडेतोड होती. पण मला अर्थातच ते पटलं नाही. कुठले विचार जिंकतात याच्यावरच काही आयुष्य चाललेलं नसतं.

इन्स्पेक्टरः त्यानं पुन्हा तुझ्या बहिणीला भेटू नये म्हणून तू काही धमकी दिलीस का ?

उदय : त्या पध्दतीनं मला फारसं वागता येत नाही.

इन्स्पेक्टरः या बाबतीत तू तुझ्या एखाद्या मित्राकडे किंवा नातेवाईकाकडे किंवा ओळखीच्या माणसाकडे बोलला होतास काय ?

उदय : मला ते तितकंसं महत्त्वाचं वाटत नव्हतं.

इन्स्पेक्टरः पण बोलला होतास काय ?

उदय : मला तरी असं काही कुणाशी बोलल्याचं आठवत नाही. तशी शक्यता नाही.

इन्स्पेक्टरः मग हा खून कुणी केला असेल असं तुला वाटतं ? अंदाज ?

उदय : ते मी कोणत्या आधारावर सांगणार ? तसा मी कोणताच अंदाज करू शकत नाही.

इन्स्पेक्टरः ठीक आहे.( आता आजोबा. ) आजोबा खून झाला तेव्हा तुम्ही तिथल्या बाकावर बसलेले होता. तो खुनी माणूस कसा होता ते जरा वर्णन करून सांगा बरं.

आजोबा : नाही ! नाही, नाही. खून माझ्यासमोर झाला नाही. मी निघून गेल्यानंतर झाला असेल.

इन्स्पेक्टरः तुम्ही नेमके कधी निघून गेला ?

आजोबाः सभा संपल्यावर गेलो. लोक खुर्च्या, टेबलं आवरत होते तेव्हा गेलो.

इन्स्पेक्टरः तुम्ही सभेला गेला होता ?

आजोबा : नाही, रोज त्याच बाकावर बसायची मला सवय आहे -- योगायोगानं सभा तिथं जवळच होती म्हणून मला ऐकू येत होतं. सगळे काळे लोक होते. अगदी तुमच्यासारखेच.

इन्स्पेक्टरः त्या काळात एखादा माणूस तिथं फिरताना किंवा तुमच्या बाकावर तुमच्या शेजारी बसलेला किंवा दुसऱ्या एखाद्या बाकावर बसलेला दिसला का ?

आजोबा : नाही, छे, असं कुणीच नव्हतं.

इन्स्पेक्टरः नीट आठवून बघा.

आजोबाः काही गरज नाही. स्मरणशक्ती अजून चांगली आहे माझी.

इन्स्पेक्टरः समजा तुम्ही खोटं बोलताहात असं मी म्हटलं तर ?

आजोबा : पंच्याहत्तर वर्षाच्या माझ्यासारख्या म्हाताऱ्याला असं म्हणायला जीभ वळेल का तुझी ? वळत असेल तर जिभेचं ऑपरेशन करून घे तुझ्या.

इन्स्पेक्टरः रागावू नका आजोबा. विचारलं आपलं. ठीक आहे. एका नागरिकाच्या खुनाचं गूढ उकलण्यासाठी तुम्ही काहीच क्लू देऊ शकला नाहीत.

आजोबा : क्ल्यू असला तर देणार नं ?

इन्स्पेक्टरः ठीक आहे, ठीक आहे, पण तरीही खुन्याला बरोब्बर शोधून काढूच आम्ही. तो सुटू शकणार नाही.

आजोबा : काढा ! काढा शोधून !

इन्स्पेक्टरः तुम्ही जाऊ शकता. पुन्हा काही गरज लागली तर मी बोलावीन किंवा भेटीन आपल्याला.

शर्मिला : जाऊ मग ? उगीचच घडलं सगळं. त्या काळ्या लोकांना निष्कारण वाटायचं की माझ्यामुळं घडलं असेल, मला तर भीती वाटते.

इन्स्पेक्टरः काही नाही, काळजी करू नका. मी त्यांना सांगीन.

उदय : जाऊ मग ?

इन्स्पेक्टरः हं, चला तुम्ही --( उदय, आजोबा आणि शर्मिला जातात. अंधार होतो. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा लांबून आवाज येऊ लागतो. एकजण म्हणतो ' व्यर्थ न हो बलिदान ' -- मागोमाग सगळे म्हणतात ' व्यर्थ न हो

बलिदान ' -- अशा सतत घोषणा देत प्रदीपची प्रेतयात्रा येते. बरोबर दोनतीन पोलीस. प्रेतयात्रेत सगळे काळे लोक असतात. प्रेतयात्रा या घोषणा देत हळूहळू लांब जाते. नंतर एक काळा, ठिगळातला, अस्वच्छ, दरिद्री माणूस बळ एकवटून चालत असल्यासारखा येतो. तो मनानं त्या प्रेतयात्रेशी एकरूप झालेला आहे. पण त्राण नाही म्हणून मागं पडला आहे. तो घोषणेत सहभागी होऊ शकत नाहीय पण हळूहळू नुसता हात घोषणेबरोबर उंचावतो, खाली आणतो. असा जातो. प्रेतयात्रेचा आवाज अस्पष्ट होत जाताना आजोबा येतात. नेहमीचा बाक. मागोमाग उदय येतो. यात्रेच्या दिशेकडे पाहात.)

उदय : पाहिलंत ?

आजोबा : हो, पाहिलं.

उदय : आता हे लोक त्याच्या खुनाचं चिक्कार भांडवल करणार.

आजोबा : हं.

उदय : म्हणजे त्याच्या एकतर्फी प्रेमप्रकरणाचा कायम गाजावाजा होत राहणार.

आजोबा : आणखी एक समस्या. मागं आपण कितीही समस्यांमधून आलो असलो तरी काही उपयोग नाही. समस्या सोडवण्याच्या सरावात राहणं हा माणसाच्या मनाचा एक असाध्य रोग वाटतो मला. माझी पंच्याहत्तर वर्षं फुकट गेली.

उदय : पण आलेल्या परिस्थितीला तोंड द्यावंच लागतं नं प्रत्येक वेळी !

आजोबा : आपल्याला सुरक्षित, सुखरूप राह्यचं असतं, पण परिस्थिती तशी नसते. त्या दोन्हीत तफावत असते. झाली समस्या. आपल्याला आपल्या किंवा दुसऱ्यांच्या सवयी बदलायच्या असतात ! किंवा टिकवायच्या असतात ! झाली समस्या. आणि यातून असंख्य समस्यांचे गुंते. आपला मनाचा, शरीराचा वापरच चुकत असला पाहिजे. काही खरं नाही.

उदय : काही उपयोग नाही असले अंदाज करून.

आजोबा : कशाचं काय होतंय हे तर पाहात गेलंच पाहिजे ! पंच्याहत्तर वर्षं फुकट गेली ! आणि आता अवघड आहे ! मी रुतलोय पुरता या सरावात ! लोकांना वाटतं, समस्या सोडवण्याचा सराव जितका जास्त तितका माणूस अनुभवी आणि शहाणा झाला ! उलट मला तर वाटतं की मूर्खपणात आणि गधडेपणात तो जास्तजास्त घट्ट रुतत गेला. समस्यांनी जगणं हे जगणंच नाही. आणि हे सगळं बाहेर कुठं काही घडत नाही. आपल्यातच घडतं.( शर्मिला येते, तिला उदय आणि आजोबा बसलेले दिसतात.)

शर्मिला : ( उदयला ) बरं झालं तू भेटलास --( तिला बरंच बोलायचं आहे पण भावनातिरेकही आहे.)

उदय : का, काय झालं ?

शर्मिला : मला एक काळा माणूस भेटला मघाशी. म्हणाला," हे तुम्ही बरं नाही केलंत ! " मी म्हटलं, " अहो मी काहीच केलं नाही आणि मला माहीतही नाही काही खरोखरच -- " तर तो म्हणाला " ठीकाय ठीकाय." आणि गेला.

उदय : हं.

शर्मिला : भयानक वाटतंय मला हे सगळं. मी काहीच केलेलं नसताना माझी चर्चा होत राहतीय. राहणाराय. मला सहन नाही होत हे, सहन नाही होत-- ( असह्य भावनातिरेकानं फुटून ) मला आत्महत्या करावीशी वाटतीय -- असं नाही मला सहन होणार --( उदय तिच्या पाठीवर हात ठेवतो.) साधं, सरळ जगत होते मी, साधं जगायचं होतं मला... ( हुंदके देत राहते...)

उदय : हे बघ शर्मिला, इथं नको, लोक जातात येतात, घरी जाऊ आपण -- अं ?

आजोबा : घरी ने तिला --

उदय : अं ? शर्मिला --

शर्मिला : साधं जगायचं होतं मला ...( भावनातिरेक. शब्द खोल जातात-- ) साधं जगायचं होतं...

...पडदा पडत जातो...

**सूचना : सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.**

पत्ता -चं.प्र.देशपांडे,
३, स्नेहदीप अपा.
चिंतामणीनगर, सहकारनगर नं.२, पर्वती,
पुणे - ४११ ००९. **दूरध्वनी - ४२२ ७८४७.**